संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

व्यसने आणि गरिबीचे चक्रव्यूह

कोणतेही व्यसन हे प्रकृती आणि पैसा या दोघांसाठीही घातकच असते. मग ते व्यसन दारू, सिगारेट, तंबाखूचे असेल किंवा अलिकडच्या तंत्रज्ञान युगात तासनतास मोबाईलवर चॅटिंग करण्याचे असो. मोबाईलवरचे गेम खेळण्याचे व्यसन असो. अलिकडे तर रील बनवण्याचे एक नवे व्यसन युवा पिढीला जडलेले आहे. अशी एक ना अनेक प्रकारची जेवढी काही व्यसने आहेत. ती काही काळापुरती दिलासा देणारी किंवा सुखकारक वाटतात. परंतु एकजात सगळ्या व्यसनांचे दीर्घकालीन दुष्परिणाम अत्यंत घातक ठरत असतात. एखाद्या गोष्टीमध्ये गुंतुन पडणे, अडकून पडणे त्याला व्यसन म्हटले जाते. किंबहुना अंतिमतः ज्याचे परिणाम विघातकच ठरतात. म्हणून त्याला व्यसन हाच शब्द वापरला जातो. कोणतीही चांगली गोष्ट जेव्हा वारंवार केली जाते. तेव्हा त्याला सवय किंवा संस्कार म्हटले जाते. परंतु अनिष्ट किंवा अयोग्य गोष्टींच्या नादी लागून आपला वेळ, पैसा, वाया घालवला जातो. त्याला व्यसन म्हणण्याशिवाय दुसरा शब्द सापडत नाही. भारतासारख्या सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या देशात वेगवेगळ्या प्रकारची व्यसने असणाऱ्यांची संख्या जवळपास चाळीस कोटी आहे. त्यामध्ये अलिकडच्या काळातल्या मोबाईल गेम किंवा रील्स चॅटिंग यासारख्या व्यसनांचा समावेश नाही. केवळ सिगारेट, तंबाखू, बिडी, गुटखा, यासारखे व्यसन असणाऱ्यांची भारतातील संख्या तब्बल २६ कोटी ७ लाख आहे. इतक्या प्रचंड प्रमाणावर व्यसनाधिन असणाऱ्या लोकांची आर्थिक परिस्थितीदेखील जेमतेम स्वरूपाचीच असते. विशेषतः मोलमजुरी किंवा रोजंदारीवर काम करणारे हे तंबाखू आणि विडीचे सर्वाधिक शौकिन असल्याचे पाहायला मिळते. सिगारेट पिणाऱ्यांचा वर्ग आर्थिकदृष्ट्या थोडा वरचा जरी असला तरी त्यांचा या व्यसनावर होणारा खर्च निव्वळ अनाठायी ठरतो. अलिकडेच भारतीय वैद्यकीय संशोधन संस्था, राष्ट्रीय कर्करोग प्रतिबंध आणि संशोधन केंद्र तसेच टाटा समाज विज्ञान संस्था यांनी एकत्रितपणे देशभरात काही ठिकाणी सर्वेक्षण आणि संशोधन करून जो निष्कर्ष काढला आहे तो नाविन्यपूर्ण आणि व्यसनाचे आर्थिक दुष्परिणाम सांगणाराही ठरला आहे.

व्यसनांवर खर्च होणारा पैसा

या अहवालातून समोर आलेली माहिती सरकार आणि समाजालासुद्धा गंभीरपणे विचार करायला लावणारी ठरते. १४० कोटीपैकी सव्वीस कोटी लोक तंबाखू आणि तंबाखूजन्य पदार्थांचे व्यसनी आहेत. याशिवाय सिगारेट, गुटखा किंवा अगदी मादक पदार्थांचे सेवन करणाऱ्यांची संख्यादेखील बरीच मोठी आहे. १४० कोटी संख्येपैकी २६ ते ४० कोटी लोक वेगवेगळ्या व्यसनावर जो खर्च करतात. तो त्यांचा व्यक्तिगत खिसा रिकामा करणारा तर ठरतोच. परंतु त्यांच्या प्रकृतीवर गंभीर परिणामही करणारा ठरतो. या अहवालाने असा निष्कर्ष काढला आहे की, या २६ कोटी लोकांनी जर आपली तंबाखूची व्यसने जर सोडली तर त्यातले जवळपास दोन कोटी कुटुंब हे दारिद्र्यमुक्त होऊ शकतात. म्हणजे गरिबीच्या दुर्दशेतून ते बाहेर पडू शकतात. साधारणपणे या व्यसनाधिन कुटुंबाचा तंबाखू आणि तत्सम व्यसनांवर तब्बल ६.४ टक्के खर्च होत असतो. जर त्यांनी ही व्यसने सोडली तर त्यांचा हा पैसा वाचू शकतो. त्यांची गरिबी नाहीशी होऊ शकते. व्यसनावरचा हा खर्च ते आपल्या रोजच्या आहारामध्ये अधिक पोषक अन्नधान्य घेऊन प्रकृती चांगली ठेवू शकतात. एवढेच नव्हे तर व्यसनावरचा हा खर्च ते शिक्षण आणि इतर चांगल्या कामांसाठीसुद्धा वापरू शकतात. शिवाय हे व्यसन सुरू असतानाच अनेकांना वेगवेगळे आजार जडतात. त्याच्या उपचारावर होणारा खर्च त्या कुटुंबाला आणखीच गरिबीच्या खाईत ढकलणारा ठरतो. कारण घरातला कर्ता सवरता पुरूष किंवा महिला आजारी किंवा व्याधीग्रस्त झाल्यानंतर कुटुंबातील कमावणारी व्यक्तीच हतबल ठरते आणि सगळे कुटुंब दारिद्र्याच्या चक्रव्यूहातच फिरत राहाते. आतापर्यंत जागतिक आरोग्य संघटनेपासून ते भारतातील अनेक वैद्यकीय संस्थांनी व्यसनांचे शरीरावर होणारे परिणाम वारंवार सांगितलेले आहेत. व्यसने आणि आजार हे सांगण्यावरच अधिकाधिक भर दिला जात होता. परंतु आता देशातील या प्रमुख संस्थांनी व्यसनाच्या दुष्परिणामांबरोबरच गरिबी दूर करणारा उपाय पहिल्यांदाच सांगितला आहे.

सकारात्मक संशोधनाचा नवा पैलू

साध्या तंबाखू आणि त्याच्याशी संबंधित व्यसनातून जर दोन-तीन कोटी लोक गरिबी मुक्त होणार असतील तर अन्य दारू, जुगार, मादक पदार्थांच्या व्यसनांपासून लोक दूर राहिले तर गरिबीतून बाहेर पडणाऱ्यांची संख्या आणखी वाढू शकते. ज्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. ती अधिक चांगली होऊ शकते. किंबहुना व्यसनांवरचा हा पैसा आरोग्याची काळजी घेण्यासाठी किंवा आणखी काही चांगले उपक्रम सुरू करण्यासाठी वापरता येऊ शकतो. आज तर आर्थिकदृष्ट्या गब्बर असलेले लोकही मौजमस्ती म्हणून व्यसने करतात. अनेक कॉर्पोरेट ऑफिसेसच्या बाहेर सिगारेट पिणाऱ्या मुलींची संख्या मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. कुठल्याही गोष्टीचा शौक आणि त्यातून व्यसन लागावे याचेदेखील भान राहात नाही. अशा केवळ व्यसनावर पैशाची उधळपट्टी करणाऱ्यांनी जर हा पैसा चांगल्या कामांसाठी वापरला तरी त्यातून एकूणच समाजाचे आर्थिक आरोग्य निश्चितपणे सुधारू शकते. सगळ्या प्रकारची व्यसने आणि आर्थिक आरोग्याला घातक आहेत. हेच या अहवालातून स्पष्टपणे सांगितले गेले आहे. या पद्धतीने समाजातल्या विविध समस्यांचे सकारात्मक संशोधन आणि निष्कर्ष समाजासमोर आणले गेले तर त्याचे महत्त्व लवकर लक्षात येऊ शकेल. व्यसने ही शरीर प्रकृतीला त्रासदायक असतातच आणि पैसा वाया घालवणारीच असतात. हे समजत असूनही उमजत नाही. परंतु व्यसने गरिबी दूर करू शकतात हे वेगळ्या पद्धतीने सांगितले जाणे तितकेच गरजेचे आहे.

सुविचार — **विलास कोळेकर**, खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

यशाला चकाकी तेव्हाच मिळते, जेव्हा प्रयत्नांचा पाया मजबूत असतो. अन् व्यक्तीला आदराचे स्थान तेव्हाच मिळते, जेव्हा त्याची प्रत्येक कृती प्रामाणिक असते.

पंचांग

शुक्रवार, २४ एप्रिल २०२६
शक १९४८ पराभवनामसंवत्सर



* वैशाख शुक्ल अष्टमी
* नक्षत्र - पुष्य
-: जन्मराशी :-
००-०१ ते ते २४-०० कर्क

रवी उदय- ०६-१७
रवी अस्त- १८-५७

श्री सत्यसाईबाबा स्मृतिदिन, श्री शंकर महाराज पुण्यतिथी-पुणे, दुर्गाष्टमी, जागतिक जलसंपत्ती दिन

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

महावितरण — **विज बंदबाबत जाहीर निवेदन**

कल्याण पश्चिम विभागातील सर्व विज ग्राहकांना कळविण्यात येते की, २२ केव्ही गोदरेज हिल उपकेंद्रातुन निघणाऱ्या **२२ केव्ही डि-मार्ट** या वाहिनीवर देखभाल व दुरूस्तीच्या कामासाठी **दि. २४.०४.२०२६** रोजी **सकाळी ८.३० ते १३.३०** वाजेपर्यंत खाली नमुद केलेल्या भागाचा विज पुरवठा बंद राहील याची कृपया नोंद घ्यावी. ग्राहकांच्या होणाऱ्या गैरसोईबद्दल महावितरण कंपनी दिलगीर आहे.

अनु. क्र.	उपकेंद्र	फिडर	भागाचे नाव
१	२२ केव्ही गोदरेज हिल	डि-मार्ट	झुलेलाल चौक, ओशोधारा, गोदरेज हिल, खडकपाडा पोलीस स्टेशन

कार्यकारी अभियंता,
कल्याण पश्चिम विभाग

जाहीर सूचना

तमाम जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, सदनिका क्र. जी-१, तळमजला, इमारत सुधा स्मृति सीएचएस लि., गोरसवाडी, एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई-४०००६४ (याखालील अनुसूचीमध्ये अधिक तपशिलवारपणे वर्णन केलेली) चे मालक आणि डिस्टिंक्टिव्ह क्रमांक १ ते ५ (दोन्ही समाविष्ट) धारण केलेले रुपये पन्नास प्रत्येकीचे पाच पूर्णतः भरणा केलेले समभाग धारण केलेले सुधा स्मृति सीएचएस लि.चे सदस्य सौ. सविता खिमजी तन्ना आणि श्री. खिमजी मोहनलाल तन्ना यांचे कोणतेही मृत्युपत्र न बनविता अनुक्रमे दि. १४.१२.२०१६ आणि २५.०१.२०२६ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात त्यांचे केवळ हयात कायदेशीर वारसः (१) सौ. उषा बाबुलाल तन्ना, (२) सौ. हर्षा अल्केश तन्ना, (३) मीनाक्षी अल्केशकुमार तन्ना, (४) हेमाली अल्केशकुमार तन्ना, (५) कौशल अल्केश तन्ना, (६) सौ. लीना भावेश तन्ना, (७) श्री. करण भावेश तन्ना, (८) कु. ट्विंकल भावेश तन्ना, (९) श्री. धर्मेश बाबुलाल तन्ना आणि (१०) सौ. ज्योती भावेश सूचक हे आहेत.

वरील संदर्भात विक्री, भेट, देवाणघेवाण, गहाणवट, प्रभार, न्यास, वारसा, ताबा, भाडेपट्टी, धारणाधिकार या मार्गे किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे कोणतेही दावे किंवा आक्षेप असणाऱ्या सर्व व्यक्तींनी त्याबाबत लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकार यांना त्यांच्या खाली उल्लेखिलेल्या पत्त्यावरील कार्यालयास सदर सूचना प्रसिद्धीपासून ७ दिवसांच्या कालावधीमध्ये त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/आक्षेपांच्या समर्थनार्थ अशा दस्तऐवज आणि इतर पुराव्यांच्या प्रतिंसह सूचित करावे. वरील विहीत कालावधीमध्ये जर कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, अशा व्यक्ती किंवा व्यक्तींचे दावे/आक्षेप, जर असल्यास, सोडून दिले आणि/किंवा त्याग केले असे समजण्यात येईल.

वरील उल्लेखित अनुसूचीः

मुंबई उपनगर जिल्हा, मुंबई येथील रजिस्ट्रार ऑफ सब-ॲश्युरन्सच्या कार्यक्षेत्रामध्ये येणाऱ्या गोरसवाडी, एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४ येथे स्थित गाव मालाड उत्तरचा भूखंड क्र. ८ सी.टी.एस. क्र. ४७८, ४७८/१ ते ७ धारण केलेल्या जमिनीच्या भूखंडावर स्थित "सुधा स्मृति को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लिमिटेड" या इमारतीच्या तळमजल्यावरील सदनिका क्र. जी-१, मोजमाप १७० चौ.फू. कार्पेट क्षेत्रफळ चे सर्व खंड आणि तुकडे.

सही/-
मुकेश जे. संगानी
ॲडव्होकेट उच्च न्यायालय
५०२, ५वा मजला, गांजावाला रेसिडेन्सी, गांजावाला लेन, बोरीवली (पश्चिम), मुंबई - ४०००९२.

ठिकाणः मुंबई
दिनांकः २४.०४.२०२६



चेन्नईचा मुंबईवर १०३ धावांनी दणदणीत विजय
संजूचे धडाकेबाज शतक! हुसैनचे ४ विकेट

■ मुंबई

संजू सॅमसनच्या धडाकेबाज शतकी खेळीच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने मुंबई इंडियन्सला १०३ धावांनी नमवले. या विजयासह चेन्नई आयपीएलच्या गुणतालिकेत ६ गुणांसह पाचव्या स्थानावर पोहोचला. मुंबईत झालेल्या आयपीएलच्या ३३ व्या सामन्यात चेन्नईने ६ बाद २०७ धावा केल्या होत्या. मात्र चेन्नईच्या अकील हुसैन आणि नूर अहमदसह गोलंदाजांनी चमकदार कामगिरी करून मुंबईच्या संघाला सर्वबाद १०४ धावांवर गुंडाळले. त्यामुळे मुंबईला पाचवा पराभव पत्करावा लागला.

चेन्नईचे सलामीवीर संजू सॅमसन आणि कर्णधार ऋतुराज गायकवाड यांनी पहिल्या ३ षटकांत ३२ धावांची भागीदारी केली. मात्र ही जोडी एएम घझनफरने फोडली. गायकवाड १४ चेंडूंत २२ धावा करून बाद झाला. संजूने मुंबईच्या गोलंदाजांना चांगलेच चोपून काढले. त्याने सरफराज खानच्या साथीत संघाची धावसंख्या ५.३ षटकांत १ बाद ७२ वर नेली. मग सँटनरने सरफराजचा त्रिफळा उडवला. सरफराजने १४ धावा केल्या. डेवाल्ड ब्रेविसला स्थिरावल्यानंतर अश्वनी कुमारने माघारी धाडले. त्याने ११ चेंडूंत २१ धावा केल्या. मात्र दुसऱ्या बाजूने संजू एक हाती फलंदाजी करून चौकार आणि षटकार ठोकत होता. कार्तिक शर्मा १९ चेंडूंत १८ धावा आणि त्यानंतर जेमी ओव्हरटन ७ चेंडूंत १५ धावा करून संजूला छोटेखाणी साथ दिली. मग संजूने ५४ चेंडूंत शतक पूर्ण केले. त्याचे हे या हंगामातील दुसरे शतक आहे. शेवटी संजू १०१ धावा आणि अकील हुसैन २ धावा करून नाबाद तंबूत परतले. त्यामुळे चेन्नईने ६ बाद २०७ धावांपर्यंत मजल मारली.

या धावसंख्येचा पाठलाग करताना मुंबईची सुरुवात अतिशय खराब झाली. क्विंटन डी कॉक (७), डॅनिश मलेवार(०), नमन धीर (०) हे तीन फलंदाज फक्त ११ धावांवर बाद झाल्याने मुंबईचा डाव अडचणीत आला. चेन्नईचे गोलंदाज वरचढ होऊन गोलंदाजी करत असताना सूर्यकुमार यादव आणि तिलक वर्मा यांनी कसाबसा संघाचा डाव सावरला.

मात्र मुंबईची धावसंख्या ११.४ षटकांत ३ बाद ८४ धावांवर पोहोचताच हुसैनने तिलकचा त्रिफळा उडवला. त्याने २९ चेंडूंत ३७ धावा केल्या. हार्दिक पांड्या (१) आणि शेर्फेन रदरफोर्ड (०) यांना नूर अहमदने एकामागून एक बाद केले. हुसैनच्या गोलंदाजीवर सूर्यकुमारचा झेल सरफराजने घेतला. त्याने ३५ धावा केल्या. शार्दुल ठाकूर (११), कृष भगत (७) आणि त्यानंतरच्या आपल्या फलंदाजांना संघासाठी काहीच करता आले नाही. त्यामुळे मुंबईचा डाव सर्वबाद १०४ धावांवर आटोपल्याने चेन्नईने १०३ धावांनी विजय मिळवला.

आयडियल कबड्डी स्पर्धात्मक शिबिरात ४० खेळाडूंचा सहभाग

■ मुंबई

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे यंग स्पोर्ट्स क्लब-घाटकोपर सहकार्याने शालेय मुलांसाठी मोफत कबड्डी स्पर्धात्मक मार्गदर्शन शिबीर २७ एप्रिलपासून घाटकोपरमधील माणिकलाल मैदान येथे सुरू होणार असून शालेय ४० खेळाडू सहभागी झाले आहेत. नवोदित खेळाडूंना तंत्रशुद्ध कबड्डी खेळाची प्राथमिक ओळख करून देऊन दुखापतीच्या भयाचे निराकरण करण्याचा उद्देश देखील आहे. समता विद्यामंदिर, माणिकलाल म्युनिसिपल स्कूल, तुलीप हायस्कूल, अभ्युदय विद्यालय आदी शाळांमधील बहुतांश खेळाडूंच्या प्रतिसाद व सोयीच्या आग्रहास्तव घाटकोपर (प.) येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमात वॉर्म अप व कबड्डी कौशल्यावर भर देण्यासाठी अनुभवी कबड्डीपटू व मार्गदर्शक सुनील खोपकर आणि त्यांचे सहकारी सुशांत खळे व सक्षम म्हात्रे उत्सुक आहेत. दोन दिवसीय शिबिरामधील उत्कृष्ट शालेय ४ खेळाडूंना विशेष पुरस्कार देऊन माजी कबड्डीपटू गोविंदराव मोहिते, कबड्डीप्रेमी विजय चव्हाण, शिवछत्रपती पुरस्कार विजेते लीलाधर चव्हाण आदी मंडळींच्या प्रमुख उपस्थितीत गौरविण्यात येणार आहे.

आयएसपीएलने अजिंक्यपद पटकाविले

■ मुंबई

आयएसपीएलने चार दिवसांपूर्वी झालेल्या पराभवाच्या जखमेवर आमदार चषक स्पर्धेच्या जेतेपदाचे मलम लावण्याचा पराक्रम केला. प्रभादेवीतील अंतिम सामन्यात बीपीसीएलकडून झालेल्या पराभवाचा बदला घेऊन त्यांनी एका झटक्यात आपला हिशेबही चुकता केला.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त क्रीडाप्रेमी आमदार सुनील राऊत यांनी आयोजित केलेल्या स्पर्धेत आयएसपीएल आणि बीपीसीएल यांच्यात झालेल्या जेतेपदाच्या संघर्षाने उपस्थित कबड्डीप्रेमींचे हृदयाचे ठोकेच चुकवले नाही तर हॉलीवूडच्या ॲक्शनपटाला साजेसा थरारक क्लायमॅक्स सादर केला. पाच-पाच चढायांच्या क्लायमॅक्समध्ये आयएसपीएलने बीपीसीएलवर ९-४ (४६-४१) अशी मात केली.

आयुष म्हात्रेच्या जागी चेन्नईत मधवालला संधी

चेन्नई - चेन्नई सुपर किंग्सने आयपीएल हंगामाच्या उर्वरित सामन्यांसाठी दुखापतग्रस्त आयुष म्हात्रेच्या जागी वेगवान गोलंदाज आकाश मधवालला करारबद्ध केले. आयुष म्हात्रे १८ एप्रिलला हैदराबादविरुद्धच्या मागील सामन्यात फलंदाजी करताना हॅमस्ट्रिंगला दुखापत झाल्यामुळे संघाबाहेर गेला होता.

मध्य रेल्वे
निविदा सूचना
निविदा सूचना क्र. सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२६५१५४/२०२६, २५.०५.२०२६ रोजी देय
निविदा क्र.: ८५२६५१५४, **निविदा शीर्षक:** १५० लिटर क्षमतेचा वायू साठवण टाकी, ड्रेन कॉकसह, आरडीएसओ रेखाचित्र क्र. सीजी-के-४०२६ अल्ट-१ नुसार, एसी-डीसी-ईएमयू डब्यांच्या वायू निलंबन प्रणालीसाठी उपयुक्त. **प्रमाण:** ४९५ नग, **देय दिनांक:** २५.०५.२०२६, **मूल्य:** रु.५२,५६,९००/-. **DE-77**
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

मध्य रेल्वे
निविदा सूचना
निविदा सूचना क्र. सीडब्ल्यूई/एमटीएन/८५२५७४३८ए/२०२६, ०८.०६.२०२६ रोजी देय
निविदा क्र.: ८५२५७४३८ए, **निविदा शीर्षक:** आयसीएफ रेखाचित्र क्र. आयसीएफ/एसटीडी-३-५-०३९ अल्ट-एफ नुसार १२५ लिटरचे स्टेनलेस स्टील वायु-साठक. **प्रमाण:** २३१, **देय दिनांक:** ०८.०६.२०२६, **मूल्य:** रु.८६,६५,९२०/- **DE-76**
सुरक्षित प्रवास करा, फूटबोर्डवरून प्रवास करणे टाळा.

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, माझे अशिल हे मे. नेमिनाथ ॲण्ड दिशा रियाल्टर्स ही भारतीय भागीदारी अधिनियम, १९३२ अंतर्गत नोंदणीकृत भागीदारी संस्था असलेल्या डेव्हलपर्स/प्रमोटर्स कडून युनिट/दुकान असलेल्या युनिट/दुकान क्र.**५**, क्षेत्रफळ **४७.६९** चौ. मीटर रेरा कार्पेट क्षेत्र जे **५१३.३४** चौ.फूट शी समतुल्य, 'इम्पीरियल लॅण्डमार्क' म्हणून ज्ञात या नव्या इमारतीच्या **बी** विंगच्या **१ल्या** मजल्यावर स्थित, एस.व्ही. रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई -४०००५६ येथे असलेले, तसेच १ कार पार्किंग जागेसह खरेदी करण्याबाबत वाटाघाटी करत आहेत.

कोणत्याही/सर्वव्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्थांना खाली नमूद केलेल्या युनिट/दुकानाच्या संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, ताबा, वारसा, पारेषण, धारणाधिकार, सुखसोयी, मृत्युपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्याचा दावा असल्यास त्यांनी याद्वारे ते लेखी स्वरूपात, दाव्याच्या समर्थनार्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह, **वकिल श्री.दिपेश जे. सांचला, कार्यालय क्र.ए-०२, तळ मजला, आलोक अपार्टमेंट कोहौसोलि, महंत रोड एक्स्टेंशन, विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथे यांच्या कार्यालयात, हे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शिर्षक, फायदे आणि/किंवा हितसंबंध, पुढील कोणत्याही सूचना न देता माफ केले गेले आहेत आणि/किंवा सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

मालमत्तेची अनुसूची

सदर सर्व ते युनिट/दुकान क्र.**५**, क्षेत्रफळ **४७.६९** चौ. मीटर रेरा कार्पेट क्षेत्र जे **५१३.३४** चौ.फूट शी समतुल्य, **'इम्पीरियल लॅण्डमार्क'** म्हणून ज्ञात या नव्या इमारतीच्या **बी** विंगच्या **पहिल्या** मजल्यावर स्थित, एस. व्ही. रोड, विले पार्ले (पश्चिम), मुंबई-४०००५६ येथे असलेले, तसेच १ कार पार्किंग जागेसह आणि सदर इमारत ज्या भूखंडावर बांधलेली आहे तो भूखंड विले पार्ले (पश्चिम) गाव, तालुका अंधेरी येथे स्थित असून, त्याचे संबंधित सीटीएस क्र.४०५, ४०५/१ ते ३ किंवा त्यासम असे असून, तो मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणी जिल्हा व उपजिल्हा अंतर्गत आहे.

दिनांकः २४.०४.२०२६
सही/-
(श्री.दिपेश जे. सांचला)
वकिल

जाहीर सूचना

सर्वसामान्य जनतेला **सूचना** देण्यात येत आहे की, माझे अशिल हे फ्लॅट मालकांशी, म्हणजे (१) श्री. हरीश नवीनचंद्र भट्ट आणि (२) सौ. शेफाली हरीश भट्ट यांच्याशी फ्लॅट क्र.२/बी, क्षेत्रफळ ३७७ चौ.फूट बिल्ट-अप क्षेत्र, तळमजल्यावर, 'विले पार्ले राजतारा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात सोसायटीमध्ये ,४७३, आझाद रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७ खरेदी करण्याबाबत वाटाघाटी करत आहेत.

कोणत्याही/सर्वव्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्थांना खाली नमूद केलेल्या फ्लॅट संदर्भात विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, ताबा, वारसा, पारेषण, धारणाधिकार, सुखसोयी, मृत्युपत्र किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक, लाभ आणि/किंवा हितसंबंध असल्याचा दावा असल्यास त्यांनी याद्वारे ते लेखी स्वरूपात, दाव्याच्या समर्थनार्थ सर्व नोंदणीकृत कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींसह, **वकिल श्री.दिपेश जे. सांचला, कार्यालय क्र.ए-०२, तळ मजला, आलोक अपार्टमेंट कोहौसोलि, महंत रोड एक्स्टेंशन, विले पार्ले पूर्व, मुंबई ४०००५७** येथे यांच्या कार्यालयात, हे प्रकाशन झाल्यापासून १४ दिवसांच्या आत कळवावे, अन्यथा असे सर्व दावे, हक्क, शिर्षक, फायदे आणि/किंवा हितसंबंध, पुढील कोणत्याही सूचना न देता माफ केले गेले आहेत आणि/किंवा सोडून दिले आहेत असे मानले जाईल.

मालमत्तेची अनुसूची

सदर सर्व ते फ्लॅट क्र.२/बी, क्षेत्रफळ ३७७ चौ. फूट बिल्ट-अप क्षेत्र, तळमजल्यावर, 'विले पार्ले राजतारा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. म्हणून ज्ञात या सोसायटीतील, ४७३, आझाद रोड, विले पार्ले (पूर्व), मुंबई - ४०००५७ येथे असलेला आणि सदर इमारत ज्या भूखंडावर बांधलेली आहे तो भूखंड टीपीएस ५ चा अंतिम प्लॉट क्र.४७३ असून, त्याचा संबंधित सीटीएस क्र.१५५४ किंवा त्यासम असा आहे व तो मुंबई उपनगर जिल्ह्याच्या नोंदणी जिल्हा व उपजिल्हा अंतर्गत आहे.

दिनांकः २४.०४.२०२६
सही/-
(श्री.दिपेश जे. सांचला)
वकिल

महावितरण — **ई-निविदा सूचना**

महावितरण कोल्हापूर परिमंडलासाठी नामांकित, प्रथितयश व अनुभवी सिमेंट पोल बनविणाऱ्या उत्पादकांकडून सिमेंट पोलचा पुरवठा करण्यासाठी खालीलप्रमाणे ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. निविदा क्र. CE/KOPZ/TECH/T-01/2026-27 कामाचे/निविदेचे स्वरुप - ८ मिटर लांब /१४० किलो व ९ मिटर लांब / २०० किलो, कोल्हापूर परिमंडलाने प्रमाणित केलेल्या REC रचनेचे सिमेंट विजेच्या खांबाचा पुरवठा करणे. निविदा रक्कम रु. ७५.०० लाख, निविदा शुल्क - ५९००/- रुपये व इसारा रक्कम रु. ७५०००/- सविस्तर निविदा महावितरणच्या https://etender.mahadiscom.in/eatApp/ या संकेतस्थळावर दि. २४.०४.२०२६ पासून उपलब्ध राहील. निविदा शुल्क केवळ ऑनलाईन स्विकारले जाईल. तसेच ते परत मिळणार नाही.

सही/-
PRO/KOPZ/26/2026-27 — मुख्य अभियंता, कोल्हापूर परिमंडल.

स्वीस चॅलेंज पद्धतीअंतर्गत जमिनीच्या तुकड्याची विक्री

बीओबी कॅपिटल मार्केट्स लिमिटेड (**"बॉबकॅप्स"**) हे स्थावर मालमत्ता ऋणकोच्या एका जमिनीच्या तुकड्याची (**"निश्चित केलेली मालमत्ता"**) विक्री करण्याकरिता स्विस चॅलेंज पद्धतीअंतर्गत बोली प्रक्रियेचे व्यवस्थापन करण्याकरिता त्यांच्या एका अशिलाकरिता प्रक्रिया सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. हस्तांतरण **"सर्व रोख"**, **"जसे आहे जेथे आहे"**, **"जसेआहे जे आहे"**, **"जसे आहे तसे"**, **"तेथे जे आहे"** आणि **"कोणत्याही आधाराशिवाय"** तत्त्वावर करणे प्रस्तावित आहे. भारतीय रिझर्व्ह बँक (वाणिज्य बँका - क्रेडीट रिस्कचे हस्तांतरण आणि वितरण) निर्देश, २०२५ दिनांक २८ नोव्हेंबर, २०२५ मध्ये ठरवून दिलेल्या पद्धतीमध्ये, आणि वेळोवेळी केलेल्या सुधारणा (**"आरबीआय निर्देश"**) नुसार स्वीस चॅलेंज पद्धती आयोजित करण्यात येईल.
निश्चित केलेली मालमत्ता गाव लोहोप, तालुका खालापूर, जिल्हा रायगड येथे स्थित मोजमाप अदमासे ९ एकर्स औद्योगिक जमिनीचा तुकडा आहे.
अशिलास निश्चित केलेल्या मालमत्तेकरिता अँकर बोली प्राप्त झाली असून, किंमत निश्चिती आणि मूल्य महत्तमीकरण करण्याकरिता स्वीस चॅलेंज पद्धतीचा अवलंब करण्याची त्यांची इच्छा आहे.
बॉबकॅप्स त्यांच्या अशिलाच्या वतीने याद्वारे परवानगी प्राप्त हस्तांतरिती आणि एआरसीज कडून स्वारस्य अभिव्यक्ती (**"ईओआय"**) आमंत्रित करीत आहेत.

ईओआय आणि इतर दस्तऐवज सादरीकरणाकरिता अंतिम दिनांक	दि. २९ एप्रिल, २०२६ रोजी सायं. ५ वा.
व्हीडीआरचा प्रवेश आणि योग्य चौकशीकरिता अंतिम दिनांक	दि. १४ मे, २०२६
अँकर बोली/राखीव किंमत	रु. १२.०० कोटी (रुपये बारा कोटी मात्र)
अँकर बोलीच्या ५% दराने किमान मार्कअप	रु. ०.६० कोटी (रुपये साठ लाख मात्र)
बोलीची सुरुवातीची किंमत	रु. १२.६०.०० कोटी (रुपये बारा कोटी साठ लाख मात्र)
बोली विस्तार रक्कम (बोली गुणक)	किमान रु. ०.२५ कोटी (रुपये पंचवीस लाख मात्र) आणि त्याच्या पटीत
ई-लिलावाचा दिनांक	दि. १५ मे, २०२६

तपशिलवार माहितीकरिता, इच्छुक पक्षकारांनी प्रक्रिया सल्लागारांच्या वेबसाईट www.bobcaps.in/tenders ला भेट द्यावी. कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता, कृपया खाली दिलेल्या ठिकाणी संपर्क करावाः

संपर्क व्यक्ती	दूर. क्र.	ईमेल आयडी
श्री. सागर भद्रा, एव्हीपी - बॉबकॅप्स	+९१ ७६६६४९२३९५	vdl.scm1@bobcaps.in
कु. मैत्री शेठ, व्यवस्थापक - बॉबकॅप्स	+९१ ९८६७९३९३०३	

बॉबकॅप्स त्यांच्या अशिलाच्या वतीने कोणतेही कारण न देता स्वीस चॅलेंज पद्धतीअंतर्गत प्रस्तावित विक्रीमधून मागे हटण्याचे आणि कोणतीही बोली त्यांच्या संपूर्ण विवेकबुद्धीने स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे हक्क राखून ठेवीत आहे.
ठिकाणः मुंबई
दिनांकः २४ एप्रिल, २०२६
BOBCAPS
बॉबकॅप्सद्वारे त्यांच्या अशिलाच्या वतीने पारित

जाहीर सूचना
(नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ च्या कलम १०२ च्या तरतूदीअन्वये)

श्रीमती निकिता निलेश शाह यांच्या धनकोंचे लक्ष वेधण्याकरिता
(मे.साई इंडो मेटल रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांचे वैयक्तिक जामीनदार)

अ. क्र.	संबंधित तपशिल	
१	वैयक्तिक जामीनदाराचे नाव (पीजी)	**श्रीमती निकिता निलेश शाह**
२.	पीजीचे नोंदणीकृत कार्यालय / प्रधान कार्यालय / निवासस्थानाचा पत्ता	निवासस्थानाचा पत्ताः फ्लॅट क्र. ४०१, ४ था मजला, कारिया हाऊस, प्रेसिडेन्सी सोसायटी, प्लॉट क्र. ५६, नॉर्थ साऊथ रोड क्र. ७, जेव्हीपीडी, जुहू, सिद्धिविनायक टॉवर आणि व्हाईट हाऊसच्या शेजारी, विले पार्ले, मुंबई - ४०० ०४९.
३.	निर्णय प्राधिकरणाच्या आदेशाची माहिती	मे. इंडो साई मेटल रिसोर्सेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या वैयक्तिक जामीनदाराविरुद्ध दिवाळखोरी निवारण प्रक्रिया सुरू करण्याबाबत एनसीएलटी मुंबई खंडपीठ-१ चा दिनांक २१ एप्रिल, २०२६ रोजीचा आदेश **(प्रकरण क्र. सी.पी. (आयबी) क्र. १०३/एमबी/२०२६)**
४.	दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया सुरू होण्याची तारीख	२१ एप्रिल २०२६ (आदेश २२ एप्रिल, २०२६ रोजी प्राप्त झाला)
५.	रिझोल्यूशन प्रोफेशनलचे नाव आणि नोंदणी क्रमांक	**अनिल काशी द्रोलिया** IBBI/IPA-001/IP-P-02327/2020-2021/13482
६.	रिझोल्यूशन प्रोफेशनलचा पत्ता आणि ई-मेल (नोंदणीकृत)	बी-५०८, एकता वुड्स, रहेजा इस्टेट, कुलुपवाडी, बोरिवली - पूर्व, राष्ट्रीय उद्यानाजवळ, मुंबई, महाराष्ट्र -४०००६६ ईमेलः anildrolia.ip@gmail.com
७.	रिझोल्यूशन प्रोफेशनलशी पत्रव्यवहार करण्यासाठी वापरला जाणारा पत्ता आणि ई-मेल	पत्ताः दुसरा मजला, बजाज भवन, जमनालाल बजाज मार्ग, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई, महाराष्ट्र-४०००२१ ईमेलः anildrolia.ip@gmail.com
८.	दावे सादर करण्याची शेवटची तारीख	१५ मे २०२६
९.	संबंधित फॉर्म्स	वेबलिंकः https://ibbi.gov.in/en/home/downloads

याद्वारे सूचना देण्यात येते की, राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई खंडपीठ (एनसीएलटी) यांनी दिनांक २१ एप्रिल २०२६ रोजीच्या आदेशान्वये, 'नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६' च्या कलम १०० अन्वये, श्रीमती निकिता निलेश शाह यांची दिवाळखोरी निवारण प्रक्रिया दिनांक २१ एप्रिल २०२६ पासून सुरू करण्याचे आदेश दिले आहेत (हा आदेश दिनांक २२ एप्रिल २०२६ रोजी प्राप्त झाला).
श्रीमती निकिता निलेश शाह यांच्या धनकोंना याद्वारे कळविण्यात येते की त्यांनी आयबीबीआय (कॉर्पोरेट जामीनदाराचे कॉर्पोरेट ऋणको यांना दिवाळखोरी निराकरण प्रक्रिया) नियम, २०१९ नुसार निर्धारित फॉर्म बी मध्ये आपले दावे सादर करावेत, तसेच त्यासोबत पुरावा ई-मेल, कुरिअर, स्पीड पोस्ट किंवा नोंदणीकृत पत्राद्वारे वरील तक्त्यातील क्र.७ समोरील पत्त्यावर पाठवावा.
दाव्याचे खोटे किंवा दिशाभूल करणारे पुरावे सादर केल्यास दंड आकारला जाईल.

दिनांकः २४ एप्रिल २०२६
ठिकाणः मुंबई
अनिल काशी द्रोलिया
रिझोल्यूशन प्रोफेशनल
IBBI/IPA-001/IP/P-02327/2020-2021/13482